# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५३७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२५/०८/२०१६

**१) बकरीची चोरी . :—**

दिनांक २३/०८/२०१६ रोजी २२.०० वा. ते २४/०८/२०१६ चे ०५.३० वा. दर. यातील फिर्यादी गोपाल धनराज भुते वय १९ वर्ष, भोसा टाकळी खै—यारंगाची बकरी कि. ३,५००/—रु. ची कोठयात बांधुन ठेवली असतांना कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. रायपुरकर पो.स्टे. वरठी करीत आहेत.

**२)तरुणीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २४/०८/०१६ रोजी ०७.१५ वा. दर. यातील फिर्यादी ही शाळेत जाण्याकरीता सायकलने भंडारा कडे येत असता यातील आरोपीने फिर्यादीचे विरुध्द दिशेने येवुन तिला क्रास करुन गेला व एकटी असल्याचे बघुन परत तिचे मागेमागे येवुन पाठलाग करुन तिला शारीरीक संभोगाची मागणी करुन शिविगाळ केली व अश्लिल कृत्य दाखवुन सोबत किचनचा छोटा चाकु दाखवुन शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४ (अ)२(अ)३(ड)२,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) अवैधरित्या जनावरांना कोंबुन निर्दयतेची वागणुक देवून वाहतुक करत असतांना विरुध्द दिशेने येणा—या वाहनाला धडक दिल्याने, एक जखमी . :—**

दिनांक २४/०८/०१६ रोजी ०१.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहनात एकुण ९ जनावरे कोंबुन प्राणी संरक्षण कायदयाचे उल्लंघन करुन वाहन हयगयीने व लापरवाहीने चालवुन विरुध्द दिशेने येणा—या महेद्रा बोलेरो पिकप गाडी क्र. एमएच ३५ के २३८३ ला खापा चौक तुमसर येथे धडक मारुन फिर्यादी चालकास किरकोळ जखमी करण्यास व इतर गायी जखमी होण्यास कारणीभुत होवुन वाहन सोडुन पसार झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,४२९भादंवि सहकलम ११,१(ड)प्राणी निदर्यतेने वागविण्याचा कायदा सहकलम ९ म.प्रा.सं.का. १९७६ सह कलम १३४/१८७,८३ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. धार्मीक पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**४) अज्ञात चाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एक गंभिर जखमी . :—**

दिनांक २३/०८/०१६ रोजी २३.००वा ते २४/०८/२०१६ चे ०२.०० वा. दर. यातील फिर्यादी अमोल नरेशराव मोहरकर वय २८ वर्ष, रा. वडेगाव याचा लहान काका परमेश्वर श्रावण मोहरकर वय ४० वर्ष, रा. वडेगाव हा शेतावरील धानाला पाणी देण्याकरीता मोटारपंप सुरु करण्याकरीता आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ एस ९१९३ ने शेतावर जात असता यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे काकाचे मोटार सायकलला रुयाळ शेत शिवार पवनी ते भंडारा रोडवर येथे धडक मारुन गंभिर जखमी केले असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.